गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १४७ वा ● सोमवार १६ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 147 | Date : 16/10/2023 | blow :Manday | Page 4 | Price 4

# समृद्धी महामार्गावरील १२ जणांच्या मृत्यूला आरटीओ अधिकारी जबाबदार

## दोघांचे निलंबन, सदोष मनुष्यवधाचा गुन्हाही दाखल






छत्रपती संभाजीनगर : समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातासाठी आरटीओ अधिकारी जबाबदार असल्याचं सांगत दोन अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आलं आहे. या दोन अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रदीप राठोड, नितीनकुमार गणोरकर असं या निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचं नाव असून दोघेही आरटीओ असिस्टंट इन्पेक्टर आहेत. ड्रायव्हर पोलिसांच्या ताब्यात असून दोनही आरटीओ अधिकाऱ्यांचा पोलीस शोध घेत आहेत. अपघात होताच आरटीओ अधिकारी त्या ठिकाणाहून पळून गेले मग नंतर परत येऊन त्यांनीच अपघात झाल्याचा फोनही केला असल्याची माहिती पोलिसांकडून मिळते आहे.

समृद्धी महामार्गावर काल रात्री झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला आहे तर इतर २३ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये लहान मुलांचाही आहे. नाशिकहून बुलढाण्याच्या सैलानी बाबाच्या दर्शनाला गेलेल्या पर्यटकांच्या ग्रुपवर काळानं घाला घातला. या अपघाताला आरटीओ अधिकारीच जबाबदार असल्याचा आरोप अपघातग्रस्तांनी केला होता. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली । **पान २ वर**

# भाजपला सत्तेतून खाली खेचायचं आहे, शरद पवारांचा हल्लाबोल



मुंबई : राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यामध्ये राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार (डहरीरव झरुरी) यांनी कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केलं. आपल्यातल्या काही लोकांनी वेगळा मार्ग निवडला. 'त्यांनी आपला अध्यक्षही निवडला', असं म्हणत शरद पवारांनी अजित पवार गटावर हल्लाबोल केला. तर भारत पाकिस्तानच्या सामन्यामध्ये मुंबईच्या खेळाडूंनी योगदान दिलं असल्याचं म्हणत शरद पवारांनी खेळाडूंचे देखील कौतुक केलं. तर शरद पवार यांनी त्यांच्या भाषणामध्ये भाजपवर निशाणा साधत म्हटलं की, आपल्याला भाजपला सत्तेतून खाली खेचायचं आहे. तर गौतमी पाटीलने नाशिकमधील शाळेत केल्यावर नृत्यावर शरद पवारांनी भाष्य केलं आहे. 'सध्या निवडणूक आयोगात राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हावर लढाई सुरु आहे. पण जर त्यांनी सामान्य माणसाच्या मनातला निकाल वाचला तर तो निकाल तुमच्या बाजूने लागेल. सध्या निवडणूक आयोगात खऱ्या राष्ट्रवादीवक संघर्ष करण्याची वेळ आली आहे. पण आपण आपली लढाई लढणार आहोत आणि जिंकणार आहोत', असा विश्वास शरद पवार यांनी कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केला.

'नाशिकमधील शाळेत गौतमी पाटीलचा कार्यक्रम ठेवला. शाळेमध्ये जर मुलांच्या समोर तुम्ही अशा गोष्टी सादर करत असाल तर हे कसलं सरकार आहे', । **पान २ वर**

# शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकारिणीचा विस्तार; ६ नवे नेते नियुक्त



मुंबईः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (डहळीं डशपर णववहरीं इरश्रीरहशल ढहरलज्ञशीू) गटाकडून कार्यकारिणीचा विस्तार करण्यात आला आहे. ठाकरे गटानं ६ नवनियुक्त नेत्यांची नावं आणि त्याच्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदाऱ्या जाहीर केल्या आहेत. नव्या कार्यकारिणी विस्तारात विनायक राऊत , अनिल देसाई, अनिल परब , राजन विचारे , रवींद्र वायकर आणि सुनील प्रभू यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच, कार्यकारिणी विस्तारात पक्षाचे उपनेते आणि संघटक पदीसुद्धा नव्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसेना कार्यकारिणीचा विस्तार केला. या विस्तारात सहा नवे नेते तसेच उपनेते आणि संघटकपदी नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. राज्यातील पक्षवाढीस बळकटी मिळावी यासाठी नव्या नियुक्त्या करण्यात आल्याचं शिवसेना ठाकरे गटाच्या वतीनं सांगण्यात आलं आहे.

खासदार विनायक राऊत, खासदार अनिल देसाई, आमदार अनिल परब, खासदार राजन विचारे, आमदार रवींद्र वायकर, आमदार सुनील प्रभू यांची नेतेपदी नियुक्ती करून शिवसेना नेते मंडळाचा विस्तार करण्यात आला आहे. तर उपनेते म्हणून विजय साळवी (कल्याण), संजय जाधव परभणी, संजय पवार (कोल्हापूर), राजुल पटेल (मुंबई), शीतल देवरू (मुंबई), शरद कोळी (सोलापूर) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.शिवसेना ठाकरे गटाचे सचिव म्हणून सरदेसाई साईनाथ दुर्गे आणि सुप्रभदा फातर्पेकर काम पाहतील, असंही ठाकरे गटाकडून जाहीर करण्यात आलं आहे. तर संघटक म्हणून अस्मिता गायकवाड (सोलापूर) शुभांगी पाटील (नाशिक) जान्हवी सावंत (कोकण) छाया शिंदे (सातारा), विलास वाव्हळ (मुंबई), विलास रुपवते(मुंबई), चेतन कांबळे (संभाजीनगर )यांची नियुक्ती असेल, असंही ठाकरे गटाकडून जाहीर करण्यात आलं आहे.

शिवसेना ठाकरे गटाच्या नेतेमंडळीमध्ये एकूण १६ जणांचा समावेश असेल यामध्ये मनोहर जोशी, लीलाधर डाके, दिवाकर रावते, सुभाष देसाई, आदित्य ठाकरे, संजय राऊत, चंद्रकांत खैरे, अनंत गीते, अरविंद सावंत भास्कर जाधव, विनायक राऊत, अनिल देसाई, अनिल परब, राजन विचारे, रवींद्र वायकर, सुनील प्रभू यांचा समावेश असेल, असंही ठाकरे गटाकडून सांगण्यात आलं आहे.

# दलितांच्या प्रश्नांसोबत ओ.बी.सी. आणि मराठा समाजाच्या आरक्षणासाठीही दलित पँथरने संघर्ष केला : ना.आठवले

## दलित पँथर ऑफ इंडिया पुन्हा स्थापन करण्याबाबत लवकरच निर्णय घेणार

मुंबई : दलित पँथरचा संघर्ष हा सामाजिक समतेसाठी संघर्ष होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातील भारत साकार करण्यासाठी दलित पँथरचा संघर्ष होता. मंडल आयोगाच्या शिफारशी मान्य करुन ओ.बी.सी. समाजाला आरक्षण मिळवुन देण्यासाठी दलित पँथरने संघर्ष केला. मराठा समाजातील गरिबांना आरक्षण मिळाले पाहिजे यासाठीही दलित पँथरने संघर्ष केला. भूमिहिनांसाठी, झोपडपट्टीवासीयांसाठी, दलितांच्या न्याय हक्कासाठी दलित पँथरने प्रचंड संघर्ष केला. भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांसाठीही दलित पँथरने संघर्ष केला. असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यय केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

औरंगाबादमधील आमखास मैदानात रिपब्लिकन पक्षाच्या वतीने दलित पँथरच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सांगता समारोहात ना.रामदास आठवले उद्घाटक । **पान २ वर**




## नऊ रात्रीचे नऊ रंग पहिला दिवस 'नारंगी'



नमस्ते नाशिक फाउंडेशन नवरात्र पहिला दिवस

# पंढरपूरमध्ये उद्या काँग्रेसची बैठक आ प्रणिती ताई शिंदे करणार मार्गदर्शन



पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्याध्यक्ष आ प्रणिती शिंदे या मंगळवारी पंढरपूर दौरा येणार असून त्यांच्या प्रमुख उपस्थिती पंढरपूर काँग्रेसचे महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार असल्याचे माहिती पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष हनुमंत मोरे यांनी दिली गेल्या काही दिवसापासून काँग्रेस पक्षाचे मरगळ दूर झाली आहे राजकीय फुटी पासून हा पक्ष अलिप्त राहिल्यामुळे काँग्रेस पक्षाचे जनमानसात टिकून आहे सन २०२४ सालात येऊ घातलेल्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्ष सज्ज होत आहे कमिटीची बैठक मंगळवारी पंढरपूर मध्ये होत आहे काँग्रेस पक्षाचे पक्ष संघटन वाढविणे याशिवाय इतर महत्त्वाच्या विषयावर या बैठकीत चर्चा होणार आहे ही बैठक मंगळवार दिनांक १७ रोजी येथील कॉलेज रोड लगत असल्याने हॉटेल धनश्री हॉलमध्ये होणार आहे या बैठकीस पंढरपूर तालुक्यातील काँग्रेसचे सर्व ज्येष्ठ नेते काँग्रेसचे सर्व विभागाचे अध्यक्ष पदाधिकारी जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी याशिवाय शहर व । **पान २ वर**




# अवैध धंदयाकडे सर्वांचे डोळे झाक,गरिबांचा संसार मोडकळीस!

## दक्षिण,उत्तर पोलिस ठाण्याच्या हद्दीत व्यवसायांनी धरला जोम?



अक्कलकोट/ विशेष प्रतिनीधीः तालुक्यातील दक्षिण,उत्तर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसायांनी जोम धरला असुन बेकायदा दारू, गुटखा,मावा,तीन पत्ती,रमीचा खेळ,सावकारी व गौण खनिज तस्करी हे धंदे राजरोसपणे सुरू आहेत.या अवैध धंद्यावर वचक बसवण्यासाठी पोलिसांचे अपयश?शिवाय पोलिसांचे याकडे लक्ष नसल्यचे स्पष्ट होत आहे.फोफावलेल्या अवैध धंद्यावर वरिष्ट पोलिसांचा अंकुश नसल्याचे नागरिकामधुन बोलले जाते.

अक्कलकोट शहरासह तालुक्यात मोठया प्रमाणात अवैध धंदे खुलेआम व मस्तपैकी चालु आहे.पोलिस मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.पोलिसांची खमकी कारवाई होताना अजून तरी जनतेला दिसले नाही.बेकायदा वाहतूक व वाळूची चोरी,ठीक ठिकाणी मावा स्टॉल असे अनेक अवैध धंदे तेजीत सुरू असताना पोलिस अधिकारी झोपेचे सोंग घेतले का?अवैध धंद्यांवर कारवाईचा फास आवळण्यात महत्त्वाची भूमिका असलेली स्थानिक गुन्हे शाखा वसुलीच्या कामात गर्क आहे का?अशी चर्चा जनतेतून कु येते. अनेक वर्षापासून अवैद्य धंद्यांचे व्यवसाय करणारे तालुक्यात कार्यरत आहेत,सहज उपलब्ध होणाऱ्या मावा गुटखा सिगारेट व दारूमुळे प्रत्येक गावातील तरुण व्यसनाच्या आहारी गेले आहेत.दारुच्या व्यसनाने अनेकांचे संसार मोडले आहेत.तर यामुळे आरोग्याचे प्रश्न देखील निर्माण झाले आहेत.हा सर्व चालणारा व्यवसाय पोलिसांना देखील माहिती आहे? मात्र अवैध धंद्याला लगाम बसू शकला नाही.दिवस मावळला की,बेवडा व्यक्ती दारूचा अड्डा जवळ करतो.नित्यनियमाने दारू पिणे आणि गावात गोंधळ घालणे,अनेकांचा दिनक्रम झाला आहे.यामुळे गावात सामाजिक शांतता बिघडत आहे.दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबाची अर्थव्यवस्था पार मोडकळीस आली आहे.

खुलेआम सुरू असलेल्या रम्मीचा खेळ खेळऊन क्लबचालक लखपती होण्याच्या नादात आहेत.तर जिंकण्याच्या नादात खेळ खेळणाऱ्यांनी कर्जबाजारी झाले आहे.शहर व तालुक्यात अवैध व्यवसायाचे केंद्र तयार होत असताना अवैध व्यवसायांनी जोम धरला आहे.पोलिसांनी तातडीने या गोष्टीकडे लक्ष केंद्रित करून हा अवैधधंदे बरबाद करावा अशी मागणी नागरिक करू लागले आहे.आता यापुढे कारवाई होणार कि नाही याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून आहे.





दैनिक
# यश सिद्धि न्यूज
सोमवार दि.१६ ऑक्टोबर २३ ०२

### ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### महायुद्धाची परिस्थिती..

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युध्द संपण्याचे नाव घेत नसतानाच आता आणखी एका जुन्या विषयाच्या निमित्ताने नवीन लष्करी संघर्षाला सुरुवात झाली आहे. इस्राएल आणि पॅलेस्टिनी यांच्यातील जुन्याच वादाने भीषण लष्करी संघर्षाचे स्वरूप प्राप्त केले असून पॅलेस्टाइनच्या स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या हमास या दहशतवादी संघटनेने ज्या प्रकारे इस्रायलवर हल्ला करून त्यांना आव्हान दिले आणि हमासने केलेल्या या हल्ल्यानंतर इस्रायलने त्याला ज्या प्रकारे प्रतिउत्तर दिले ते पाहता या दोघांमधील संघर्ष आगामी काही दिवस चालूच राहणार आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यात जेव्हा साधारण दोन वर्षांपूर्वी युध्द सुरू झाले तेव्हा जगाला थोड्याफार प्रमाणात धक्का बसला होता. पण आता दोन वर्षांनंतर या युध्दाची तीव्रता काही प्रमाणात कमी झाली असली तरी हे युध्द अद्याप बंद झालेले नाही. पण रशिया-युक्रेन यांच्यातील युध्द आणि इस्रायल- हमास संघटना यांच्यातील संघर्ष यामध्ये खूपच मूलभूत फरक आहे. एकतर रशिया आणि युक्रेन यांच्यातील युध्दानंतर जगाची विभागणी थेटपणे झाली नव्हती. अनेक देशांनी रशियाला थेट विरोध करून युक्रेनला पाठिंबा दर्शवला असला तरी सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहार व्यवस्थित सुरू राहिले आहेत. पण जेव्हा इस्रायल आणि पॅलेस्टाइन यांच्यातील संघर्ष सुरू होतो तेव्हा त्याला नेहमीच अरब विरुध्द इस्रायल असे स्वरूप प्राप्त होते आणि जगाची विभागणी आपोआपच मुस्लीम देश आणि गैरमुस्लीम देश अशी होते. या भूमीवर पॅलेस्टाइन मुक्तीच्या तत्त्वाखाली निर्माण झालेल्या हमाससारख्या दहशतवादी संघटनांना जगातील अनेक मुस्लीम देशांचा पाठिंबा आहे. अनेक प्रमुख मुस्लीम देशांना हमास संघटनेबाबत सहानुभूती वाटते आणि हे देश या संघटनेला आर्थिक, लष्करी अशी सर्व प्रकारची मदत करतात, ही गोष्टी लपून राहिलेली नाही. म्हणूनच इस्रायल आणि पॅलेस्टाइन यांच्यातील या नवीन लष्करी संघर्षामुळे पुन्हा एकदा जगाची विभागणी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तो टाळायचा असेल तर युनोने खऱ्या अर्थाने आपली जबाबदारी पार पाडण्याची गरज आहे. अशा लष्करी संघर्षामध्ये कोण्या एका देशाची बाजू घेऊन काहीही साध्य होत नाही, अशा प्रकारचा लष्करी संघर्ष संपवण्यासाठी काय करता येईल हे पाहणे सर्वात जास्त महत्त्वाचे असते. ती जबाबदारी आता युनो संघटनेबरोबरच अमेरिका, रशिया, चीन आणि भारतासारख्या मोठ्या महासत्तांनाच स्वीकारावी लागणार आहे. अन्यथा या महायुध्दातील परिस्थितीआणखी बिघडू शकते.

पान १ वरुन

### समृद्धी महामार्गावरील १२ जणांच्या..

आहे. नाशिक जिल्ह्यातील ३५ भाविक बाबा सैलाणीच्या दर्शनासाठी गेले होते. ते तेथून परतत असताना वाहनाला अपघात झाला. टेम्पो ट्रॅव्हल्सची उभ्या ट्रकला धडक बसली. समृद्धी महामार्गाच्या वैजापूर येथील जांबरगाव टोल नाक्याजवळ ही घटना घडली आहे. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाखांची मदत जाहीर केली. तसेच जखमींवर शासकीय खर्चानं उपचार करण्याचे निर्देश दिलेत तर पंतप्रधान मोदींनींही यावर शोक व्यक्त केला. पंतप्रधानांनी मृतांच्या नातेवाईकांना दोन लाखांची मदत जाहीर केली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक मनीष कालवानिया यांनी दिली. ते म्हणाले की, या प्रकरणी फिर्यादी कमलेश मस्के याने दिलेल्या माहितीनुसार आरोपी ड्रायव्हर ब्रिजेशकुमार याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरटीओ अधिकारी प्रदीप राठोड, नितीनकुमार गणोरकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचं निलंबन करण्यात आलं आहे.

कसा घडला नेमका अपघात?

बुलढाण्याहून वैजापूर मार्गे निघालेल्या या ट्रॅव्हल्स बसमध्ये एकूण ३६ प्रवासी होते. हे सर्वजण बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी बाबा दर्गाचे दर्शन करून पुन्हा नाशिककडे परत निघाले होते. ज्यात काही लहान मुलांचा देखील समावेश होता. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरच्या समृद्धी महामार्गावर आल्यावर बसच्या पुढे एक ट्रक चालत होता. यावेळी जांबरगाव टोलनाक्याजवळ ट्रकला अचानकपणे एका आरटीओच्या पथकाने हात दाखवत थांबण्याचा इशारा केला. यामुळे ट्रक चालकाने जागेवरच ब्रेक मारला. त्यामुळे मागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रॅव्हल्स बस चालकाला काही कळायच्या आत ट्रॅव्हल्स बस ट्रकवर जाऊन धडकली. हा अपघात एवढा भीषण होता की, ट्रॅव्हल्स बसच्या पुढच्या भागाचा अक्षरशः चुराडा झाल्याचे दिसून आलं. मात्र या अपघातात पुन्हा एकदा बारा निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावर प्रवाशांसाठी काळरात्र ठरली आहे.

### भाजपला सत्तेतून खाली..

असा सवाल यावेळी शरद पवार यांनी उपस्थित केला. 'हे सरकार मुलांचं भविष्य धोक्यात घालतंय. या सरकारने २० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला. त्या मुलांनी शिकायचं कसं', असा सवाल शरद पवार यांनी सरकारला विचारला आहे. '१९,५५३ मुली बेपत्ता झाल्याची माहिती माजी गृहमंत्र्यांनी बैठकीत दिली. एवढ्या महिला आणि मुली गायब आहेत, त्यांच्या घरच्यांची काय अवस्था असेल. त्यामुळे राज्यातील महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न देखील आता ऐरणीवर आला आहे. हे सरकार त्यांच्यासाठी काहीच करत नाहीये', त्यामुळे हे सरकार बदलण्याची भूमिका आता आपल्याला घेणं गरजेचं असल्याचं शरद पवारांनी यावेळी म्हटलं.

'सध्या भाजप कुठे आहे हाच प्रश्न आहे. तुम्ही संपूर्ण भाराताचा नकाशा घ्या आणि पाहा. संपूर्ण दक्षिण भारतातून भाजप गेलं आहे. गोव्यात त्यांना आमदार फोडले म्हणून त्यांची सत्ता आली. महाराष्ट्रात देखील उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली सरकार होतं, ते पाडून सत्ता आणली. गुजरातमध्ये त्यांची सत्ता आहे. पण राजस्थान, उत्तराखंड, दिल्ली इथे कुठेच भाजप नाही. काही मोजक्या राज्यात भाजप आहे. बाकी संपूर्ण देशात भाजप कुठेच नाही', असं शरद पवारांनी म्हटलं.

'कंत्राटी पद्धतीने नोकरी देणं म्हणजे त्या ठिकाणी काम करणाऱ्या माणसाला नोकरीची खात्री नाही. जेव्हा एखादा माणूस नोकरी करण्याचा विचार करतो तो आयुष्यभरासाठी. पण फक्त अकरा महिन्यांसाठी त्याला कामावर घेणं हे किती योग्य आहे, असा सवाल शरद पवार यांनी उपस्थित केला. कंत्राटी पद्धतीने नोकर भरती हा प्रकार मी कधीच महाराष्ट्रात पाहिला नाही. मी सुद्धा गृहमंत्री होतो, मुख्यमंत्री होतो. त्यामुळे अकरा महिन्यांनंतर त्यांनी काय करायचं. कंत्राटी पद्धतीवर नोकर भरती करण्याचं वाईट काम या देशात अजूनही कोणी केलं नाही', पण हे भाजपचं सरकार महाराष्ट्रात करत आहे, असं म्हणत शरद पवार यांनी कंत्राटी पद्धतीने होणाऱ्या भरती प्रक्रियेवर निशाणा साधला.

### दलितांच्या प्रश्नांसोबत ओ.बी.सी

म्हणून बोलत होते. यावेळी दलित पँथरमध्ये काम केलेल्या ज्येष्ठ पँथर कार्यकर्त्यांचा ना.रामदास आठवले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी दलित पँथरमध्ये काम केलेले ज्येष्ठ नेते दिवंगत प्रितमकुमार शेगांवकर , माजी आमदार दिवंगत टी.एम. कांबळे आणि ज्येष्ठ नेते यशपाल सरवदे या दिवंगत पँथर नेत्यांचा सन्मान त्यांच्या कुटुंबियांनी स्विकारला.ज्येष्ठ नेते पँथर गंगाधर गाडे यांचाही सन्मान यावेळी जाहीर करण्यात आला. मेळाव्याच्या प्रवेशद्वारास दिवंगत प्रितमकुमार शेगांवकर यांचे नाव देण्यात आले होते तसेच ज्येष्ठ नेते गंगाधर गाडे यांचेही नाव मेळाव्याच्या प्रवेशद्वारास देण्यात आले होते.

दलित पँथर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दलित पँथरच्या ५० वर्षाच्या इतिहासाचे सिंहावलोकन करताना मुळ दलित पँथर ही संघटना केवळ ३ वर्ष चालली असली तरी जगभर दलित पँथरने आपली नोंद केली. दलित पँथर क्रांतीचा विचार होता. मात्र त्या विचाराला क्रांतीचे, लढ्याचे, आंदोलनाचे आणि लोकचळवळीचे राज्यव्यापी संघटनेचे स्वरूप भारतीय दलित पँथरने मिळवून दिले. भारतीय दलित पँथरने तरुणांना स्वाभिमान आणि सामाजिक क्रांतीचा लढाऊबाणा दिला. भारतीय दलित पँथर महाराष्ट्राच्या गावागावात आणि संपूर्ण देशात पोहचली. त्यामुळे दलित पँथरला जिवंत ठेवण्याचे काम भारतीय दलित पँथरने केले. असे मत ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा १६ वर्ष भारतीय दलित पँथरने लढविला. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी भारतीय दलित पँथरची आक्रमक शैली आजही तरुणांना हवीहवीशी वाटत आहे.

भारतीय दलित पँथरने गावागावात दलित मराठा वाद मिटवुन सामाजिक एकोपा निर्माण केला. त्यामुळे आता सामाजिक संघटना म्हणून भारतीय दलित पँथरची पुन्हा उभारणी करण्याचा विचार आम्ही करीत आहोत.त्यासाठी येत्या दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी साहित्यीक आणि विचारवंताची लोणावळा येथे बैठक आयोजित केली आहे. त्यामुळे समाजात पुन्हा भारतीय दलित पँथरचे वादळ उभे करण्याचे विचाराधीन असल्याचे ना. रामदास आठवले यांनी जाहीर केले.

यावेळी रिपाइंचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम हे या मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ विचारवंत अर्जुन डांगळे, ज्येष्ठ साहित्यीक शरणकुमार लिंबाळे, ज्येष्ठ साहित्यीक ऋषीकेश कांबळे, रिपाइंचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, पप्पु कागदे, ज्येष्ठ नेते दिलीप जगताप, मिलिंद शेळके, ॲड.ब्रम्हानंद चव्हाण, दौलत खरात, किशोर थोरात मुख्य संयोजक संजय ठोकळ, नागराज गायकवाड, श्रीकांत भालेराव, डी.एम. चव्हाण,दयाल बहादूर; परशुराम वाडेकर, डि.एन. दाभाडे, विजय सोनवणे, चंद्रकांत चिकटे, राजा ओवाळ, सिध्दार्थ भालेराव, भाष्कर रोळे, संजय बनसोडे, विजय मगरे, राकेश पंडित, दिलीप पाडमुख, आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

### पंढरपूरमध्ये उद्या काँग्रेसची बैठक..

तालुका काँग्रेसचे पदाधिकारी यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आव्हान पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हनुमंत मोरे तसेच शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी यांनी केले आहे


पंढरपूर मध्ये होणारी ही काँग्रेसची बैठक पुढील काळासाठी महत्त्वाची ठरणार असून या बैठकीत काँग्रेसच्या प्रत्येक उमेदवार समोर येण्याची चिन्हे आहेत पंढरपूरमध्ये होणारी काँग्रेसची बैठक तालुक्यात बरेच काही देऊन जाणारी ठरेल असा अंदाज राजकीय जाणकाराकडून व्यक्त केला जात आहे

## बुध्द प्रिय असोक राजा..

मोठेपणा येतो. आणि दुसऱ्या संप्रदायाचा फायदा होतो याच्या विरुद्ध केलेतर आपल्या सम्प्रदायाचे नुकसान होते व दुसऱ्याच्या सम्प्रदायाचे नुकसान होते. जो कुणी आपल्या संप्रदायाच्या आसक्तीमुळे आपल्या संप्रदायाची स्तुती करतात आणि दुसऱ्या संप्रदायायाची निंदा करतात. कशासाठी ? आपल्या संप्रदायाला प्रकाशित आणण्यासाठी. पण वास्तवात असे करून स्वत:च्या संप्रदायाला फार हानी पोहोचवतात. म्हणून एकत्र येणे फार प्रसंशनीय आहे का ? कारण ते एकमेकांचे ऐकू शकतात. आणि दुसऱ्यांचा धम्म जास्त ऐकण्याची इच्छा करू शकतात. यासाठी देवानंपियस पियदस्सी राजाची इच्छा आहे. काय ? की सर्व संप्रदायाना हे चांगले माहित असावे आणि त्यांनी चांगले वागावे आणि जे ह्या किंवा त्या संप्रदायाकडे आकर्षित झाले आहेत. त्यांना हे माहीत असावे, देवानंपियस पियदस्सीला दानाबद्दल किंवा मान देण्याबद्दल इतके जास्त वाटत नाही, जितके काय ? की सर्व संप्रदायात मुलभूत गोष्टींचा विकास झाला पाहिजे आणि ऐकमेकांची गणु ग्राहकता वाढली पाहिजे ह्यासाठी धम्म महामात्रांची, महिलांवरील अधिक्षकांची, व्रजभुमिकांची आणि इतर अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. आणि हे त्याचे फळ आहे. स्वत:च्या संप्रदायाची प्रतिष्ठा ठेवणे आणि धम्माला प्रकाशित करणे.

भगवान बुद्धाने प्रवर्तित केलेले धम्मचक्र त्याकाळी सारीपुत्तसारख्या अनेक अनुयायांनी चालविले परंतु त्यानंतर बुध्दाच्या धम्मचक्राला जी ऐतिहासिक गती दिली ती सम्राट अशोकाने! सम्राट अशोकाने राज्याभिषेकाच्या आठव्या वर्षी कलिंगची लढाई जिंकली. ते युद्ध त्याच्या जीवनातील शेवटचे युद्ध ठरले. त्या युद्धात एक लाख सैनिक मारले गेले,दिड लाख सैनिक कैदी झाले. तीन लाख सैनिकांना बंदिस्त बनविण्यात आले. युध्दात मारल्या सैनिकांच्या विधवांचा रडण्याचा व बालकांच्या आक्रोशाने त्यांच्या मनावर खूप गंभीर परिणाम झाला. त्याला खूप पश्चाताप झाला.सम्राट अशोकाच्या शोकाकुल मनाच्या अवस्थेत त्याला शांतीची गरज होती त्याचवेळी भिक्खू मोग्गलीपुत्त तिस्स या भिक्खूची भेट झाली. त्यांनी सम्राट अशोकास अप्पमाद वग्ग याचा उपदेश दिला.ज्या दिवशी सम्राट अशोकाने शस्त्रांचा त्याग केला तो दिवस अश्विनी शुध्द दशमी इसपूर्व २६६ घडलेल्या जागतिक इतिहासात अशोकुविजयादशमी म्हणतात.

भाग २



याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणजे अश्विनी शुध्द दशमी १९५६ रोजी धम्म स्विकार करून सम्राट अशोक यांच्या अशोकविजयादशमीला पुन्हा पुर्नजिवित केले म्हणून या धम्मचक्र परिवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. किंवदंतिय नुसार अग्नी संस्कार नंतर सम्राट असोकांची शय्या सात दिवस आणि रात्र सतत जळत होती.

सम्राट असोकांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळात आपल्या जेवण्याच्या भांड्यासह आपली संपूर्ण संपत्ती संघाला दान दिली होती. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणाला त्यांच्याजवळ केवळ एक आवळ्याचे फळ शिल्लक होते ते देखील त्यांना भिक्खूसंघाला दान दिले होते. जेव्हा हे आवळ्याचे फळ असोकारामाच्या भिक्खूंना दान मिळाले. तेव्हा असोकारामाच्या संघनायकाने भिक्खू संघासाठी तयार होते असलेल्या खिचडीत त्या आवळ्याच्या फळाला बारीक कुटुण ती पावडर खिचडीत मिक्स केली.अश्याप्रकारे सम्राट असोकांनी शेवटचे दान हे भिक्खूसंघास अन्नदानतून दिले.

यामुळे कार्तिक पौर्णिमेला आवळ्याच्या झाडाची पुजा व आवळा खाण्याची परंपरा सुरू झाली.

महापरण्या ते छढं मस्सानं अच्चयेन,
असोको धम्मिको राजनो परि निब्बूतो ति।
इसिमहापथ रञ्ञो असोको,
चक्कवतिस्स धम्मराजिक थूपं करोन्ति।
उत्तरविहाठ्ठकथायं थेर महिन्द

उत्तरविहार कथनानुसार सम्राट अशोकांचे निब्बाण इसपूर्व २३२ कार्तिक पौर्णिमाच्या दिवशी वयाच्या ७२ वर्षी निर्वाण झाले. सम्राट असोकांच्या शरिरधातूवर ऋषिराज मार्गावर सारनाथ येथे धर्मराजिका स्तूप बांधला आहे. अखंड भारताच्या एकमेव बौद्ध सम्राट असोक महान यास शतशः नमन.

**अजय पवार**

## नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य ६५ वर्षाचे झाले : मारुती बनसोडे

नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेला १६ ऑक्टोबर रोजी ६५ वर्ष होत आहेत .महाराष्ट्र राज्यातील सर्वात जुनी संस्था आहे गेली ६५वर्ष या मंडळाकडून व्यसनमुक्तीसाठी प्रचार प्रसार आणि प्रबोधन केले जात आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी या मंडळाची धुरा सांभाळली आहे. गेल्या पासष्ट वर्षात अनेक मान्यवरांनी या मंडळाचे संघटक म्हणून काम केले आहे. धाराशिव जिल्ह्यात सध्या परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग चे सचिव मारुती बनसोडे हे नशा बंदी मंडळाचे जिल्हा संघटक म्हणून काम करीत आहेत. सुरुवातीला दारुबंदी प्रचार प्रसार विभाग होता पण आता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत व नशा बंदी मंडळाच्या पुढाकाराने संपुर्ण राज्यात प्रत्येक जिल्हयात संघटक नियुक्त केला आहे व त्यांच्या कडून जिल्हयात व्यसमुक्तीसाठी प्रचार प्रसार आणि प्रबोधन करण्यात येत आहे. जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद व सहाय्यक उपायुक्त समाज कल्याण विभाग यांच्या सोबत विविध उपक्रम राबविले जात आहेत.२ ते ८ऑक्टोबर या कालावधीत व्यसनमुक्ती सप्ताह साजरा करण्यात आला आहे आता नवरात्र महोत्सवानिमित्त व्यसन विरोधी विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

नशा बंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षाताई व राज्याचे मुख्य संघटक अमोल मडामे सर यांच्यासह सात विभागीय संघटक आणि ३४जिल्हा संघटक हे नशा बंदी मंडळाचे काम अत्यंत समर्पित भावनेने करीत आहेत. राज्यातील सर्व मीडियाने या कामाची चांगली दखल घेतली आहे. आता राज्य शासनाकडे मंडळाच्या काही मागण्या प्रलंबित आहेत. त्या मागण्या मान्य करुन राज्य सरकारने पुरोगामी विचारांचा सन्मान करावा व राज्य शासनाच्या या मंडळाला आर्थिक सहाय्य करुन व्यसनाच्या आहारी जात असलेल्या युवा पिढीला व्यसमुक्तीसाठी काम करणाऱ्या नशा बंदी मंडळाला प्रेरणा देण्यासाठी निधी ची कमतरता भासू देऊ नये असे वाटते राज्यातील हे एकमेव संघटन आहे जे शासनाच्या सोबत तुटपुंज्या मानधनावर पण प्रामाणिकपणे गेली पासष्ट वर्षे काम करीत आहे सामाजिक जाणिवेतून काम करणारे अनेक कार्यकर्ते मंडळाला जोडलेले आहेत. मंडळ राज्यातील प्रत्येक जिल्हयात प्रत्येक तालुक्यात गावागावात प्रबोधनाचे काम करीत आहे. अशा या ऐतिहासिक मंडळाला ६५ वर्षे आज पूर्ण होत आहेत याचा एक जिल्हा संघटक म्हणून मला अभिमान वाटतो मंडळाला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देतो

**– मारुती बनसोडे, जिल्हा संघटक,**
**नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य**
**जिल्हा धाराशिव मो.९५९५१७१८६६**

## स्वेरी इंजिनिअरिंगच्या प्रा.नीता कुलकर्णी यांना पीएच.डी.प्राप्त

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर- गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्युट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील प्रा.नीता प्रेमकुमार कुलकर्णी यांना 'डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ फ्लेक्झीबल मल्टी इनपुट अँड मल्टी आऊटपुट (एमआयएमओ) अँटेना फॉर फाईव्ह-जी एप्लिकेशन्स' या विषयात नुकतीच पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी आपला शोधप्रबंध कोल्हापूर मधील संजय घोडावत विद्यापीठामध्ये सादर केला होता. पीएच.डी. प्राप्त केल्यामुळे डॉ. नीता कुलकर्णी यांचा स्वेरीतर्फे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांच्या हस्ते आणि स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या प्रेरणेने, डॉ. आर.एम.लिनस व डॉ.एन.बी.बहादुरे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली व विभागातील इतर प्राध्यापकांच्या तसेच परिवारातील सदस्यांच्या सहकार्याने प्रा.नीता कुलकर्णी यांनी पीएच.डी. पूर्ण केली. 'फ्लेक्झीबल अँटेना' विकसित करण्यासंदर्भात त्यांनी संशोधन केले आहे. डॉ. नीता कुलकर्णी ह्या स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये गेल्या १४ वर्षापासून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागात उत्कृष्टपणे ज्ञानदान करत आहेत. त्यांचे अनेक संशोधनपर लेख हे आंतरराष्ट्रीय जर्नल्स मधून प्रकाशित झालेले आहेत. 'स्वेरी' या संस्थेच्या नावातच 'रिसर्च' हा शब्द असल्याने सुरुवातीपासूनच स्वेरीमध्ये संशोधनास प्रोत्साहन दिले जाते. स्वेरीमध्ये असणारे संशोधनपूरक वातावरण, विविध संस्थासोबत असणारे सामंजस्य करार, उपलब्ध असणाऱ्या विविध संशोधनपर प्रयोगशाळा या सर्व बाबींमुळे स्वेरीतील वातावरण हे संशोधनास अतिशय पोषक बनले आहे. या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम म्हणजे स्वेरीतील पीएच.डी.प्राप्त प्राध्यापकांची संख्या वरचेवर वाढत आहे. प्रा. नीता कुलकर्णी यांना पीएच.डी.पदवी मिळाल्यामुळे स्वेरीत पीएच.डी. धारकांची संख्या वाढली असून आता स्वेरीत पीएच.डी.प्राप्त ३७ प्राध्यापक कार्यरत आहेत तर सुमारे ३० प्राध्यापकांची पीएच. डी. सुरु आहे. 'परिवार आणि शिक्षण' या दुहेरी व्यापामधून प्रा. नीता कुलकर्णी यांनी अथक परिश्रमाने पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पीएच.डी. प्राप्त केल्यामुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, इतर पदाधिकारी व विश्वस्त, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी संस्थेअंतर्गत असणाऱ्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, इंजिनिअरिंगचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. नीता कुलकर्णी यांचे अभिनंदन केले.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# महाराष्ट्रात लवकरच उच्च न्यायालयाचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने जिल्हा व तालुका पातळीवर हुशार वकील आपल्या गावांमधून करू शकणार युक्तिवाद : ॲड.असीम सरोदे

पुणे/ मुंबई/प्रतिनीधी : भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड एकटेच पुरोगामी विचारांचे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा न्यायव्यस्थेत वापर करावा या मताचे आहेत की काय? त्यांनी मांडलेल्या मतांना आणि आदेशांना इतर उच्च न्यायालयांच्या संथ प्रतिसाद का असतो? असे प्रश्न न्याययंत्रणा सतत मागास ठेवणाऱ्या प्रवृतींच्या न्यायव्यस्थेतील काही लोकांकडे बघून पडतो असे मतड.असीम सरोदे यांनी आज पत्रकारपरिषदेत व्यक्त केले. त्यांच्यासह लॉ लॅब इनोव्हेशन इंडियाचे सदस्य तसेच ड.श्रीया आवले, ॲड.बाळकृष्ण निढाळकर, ड. रमेश तारू उपस्थित होते.

मुंबई उच्च न्यायालयासह महाराष्ट्रातील सगळया न्यायालयांचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने व हायब्रीड मोडद्वारे सुरू करा या मागणीसाठी 'लॉ लॅब इंडिया' व पक्षकार संघटनेची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दिनांक २३४२ पासून पेंडीग आहे व त्याबाबत कोणतीही सुनावणी होत नाही हे दुर्दैवी आहे. न्यायालय ही व्यवस्था न्याय मागणाऱ्या पक्षकारांच्या व सामान्य नागरिकांच्या मालकीची आहे त्यामुळे ऑनलाइन तसेच हायब्रीड पद्धतीने कामकाज केल्याने त्यांचा सहभाग वाढेल, न्यायालयीन कामकाजाचा खर्च कमी होईल व पारदर्शकता वाढेल असे जनहित याचिकेत नमूद केले असल्याचे ऍड असीम सरोदे म्हणाले. मुंबई उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार, सुप्रीम कोर्टाची ई-कोर्ट कमिटी व राष्ट्रीय सूचना केंद्र (छखउ) यांना जनहित याचिकेत प्रतिवादी करण्यात आलेले आहे.

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात ही जनहित याचिका दाखल करण्यात आली परंतु त्यावेळी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्याचे आदेश दिले आणि आता मात्र त्यांनीच भारतातील सर्व उच्च न्यायालयांना दोन आठवड्यात ऑनलाइन तसेच हायब्रीड मोड पद्धतीने कामकाज सुरू करण्याचे आदेश दिले हे अनाकलनीय आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील कोणत्याच बार असोसिएशनद्वारे अशा प्रश्नांवर कृतीशीलता दाखविण्यात येत नाही. खरे तर ऑनलाइन व हायब्रीड मोड पद्धतीने उच्च न्यायालयांचे कामकाज चालावे ही मागणी सगळ्यांनी उच्च न्यायालयाच्या मुख्य निबंधकांकडे करावी यासाठी आम्ही महाराष्ट्रातील ३८ जिल्हा बार असोसिएशनला पत्र पाठविले आहेत.

ऑनलाईन व हायब्रीड पद्धतीने उच्च न्यायालयाचे कामकाज चालवणे हा संविधानातील कलम २१ नुसार नागरिकांच्या मुलभूत हक्कांचा भाग आहे असे जाहीर करावे, ऑनलाईन व हायब्रीड पद्धतीने उच्च न्यायालयाचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक ते नियम व कार्यपद्धती ठरऊन जाहीर करावी, उच्च न्यायालयात दाखल कागदपत्रे वकील व पक्षकारांना ऑनलाईन बघता यावीत, कोणत्या केसेस लागणार याचा टाइम टेबल (लॅंीशलिस्ट ) एक आठवडा आधीच जाहीर करावी अश्या मागण्या जनहित याचिकेतून करण्यात आलेल्या आहेत.

पुढील महिन्याभरात अनेक तांत्रिक बदल उच्च न्यायालयाच्या कामकाजात होतील आणि ऑनलाईन व हायब्रीड पद्धतीने उच्च न्यायालयाचे कामकाज सुरु करण्याशिवाय आता पर्याय नाही. हि आधुनिकता स्वीकारल्यास महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील गरीब व्यक्ती न्यायालायच्या कामकाजात सहभागी होतील, तालुका पातळीवरील वकील सुद्धा उच्च न्यायालयात वकिली करू शकतील असा विश्वास ड.असीम सरोदे यांनी व्यक्त केला.

# विनोद विरघट सरांची वडिलांना जलरुपी आदरांजली



अकोला/प्रतिनिधीः तेल्हारा तालुक्यातील ग्राम भानापुर येथील विनोद विरघट सर यांनी वडीलांचा प्रथम स्मृती दिन गावातील स्मशान भुमीला सर्व सुविधा युक्त अशी पाण्याची टाकी दान देऊन जलरुपी आदरांजली वाहली. महाराष्ट्र हा पुरोगामी विचारसरणीचे राज्य आहे याची वारंवार प्रचीती येते. फुले शाहु आंबेडकर यांच्या कार्याने व विचाराने महाराष्ट्राची ओळख जगाच्या पाठीवर निर्माण झाली आहे. समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्यावर आधारित सर्व सामान्य माणसाला सन्मानाचे, स्वाभिमानाचे व प्रगतीचे जिवन जगण्यासाठी प्रेरणा देणारे महान नायक म्हणजेच फुले शाहु आंबेडकर होत. फुले शाहु आंबेडकर यांच्या कार्य व विचाराशी प्रामाणिक राहुन आणि सामाजिक जबाबदारी स्विकारून विनोद विरघट सर यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक कामाला सहकार्य करून स्वतःला फुले शाहु आंबेडकर यांचे वैचारीक वारस असल्याचे सिद्ध करून दिले. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वाचनालय सुरू करुन अनेकांना शिक्षणासाठी मोठा आधार दिला. विनोद विरघट यांचे वडील दिवंगत प्रल्हादराव विरघट यांच्या प्रथम स्मृतीदिना निमित्त गावातील स्मशानभूमीला सर्व प्रशस्त असा जलकुंभ दान देऊन एक क्रांती करून अंधविश्वास दुर करण्याचा प्रयत्न केला. स्मशानभूमीत वडीलांचा प्रथम स्मृती दिन, जलकुंभ उद्धाटन करून लोकांना स्मशानभूमीत च भोजनाची व्यवस्था करून स्मशानालाही आदराचे स्थान निर्माण करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. वडीलांच्या प्रथम स्मृतीदिना निमित्ताने आयोजित जलकुंभ उद्धाघट सोहळ्याला विनोद विरघट सरांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना एकत्र करून एक खुप मोठा आदर्श समाजा समोर ठेवला. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना समाज एकता अभियान अंतर्गत मानचिन्ह देऊन सन्मानित सुद्धा करण्यात आले. वडिलांचा स्मृतीदिन हा समाजातील लोकांना जागृत करून प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल अशा पद्धतीने त्यांनी साजरा करून एक नविन पायंडा पाडला.

या ऐतिहासिक सोहळ्याचे अनेक मान्यवर साक्षीदार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गावच्या सरपंच सपना धम्मपाल वाकोडे या ह्या तर कार्यक्रमाची सुरवात ही भंते शाक्यपुत्र राहुल यांच्या धम्म देसनेने झाली. जलकुंभ लोकार्पण सोहळा हा उपस्थित सर्वच मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या मध्ये मा. बळवंतराव अरखराव सर (उप विभागीय अधिकारी अकोट), प्रा. मुकुंद भारसाखळे (प्रतिष्ठान अकोला) मा. संदिपपाल महाराज (सत्यपाल महाराज यांचे शिष्य), मा. रामपाल महाराज (सत्यपाल महाराज यांचे शिष्य), मा. शेषराव टाले (मुख्याधिकारी न. प. बाळापूर), मा. सतिश प्रघणे (अध्यक्ष, समाज एकता अभियान, पुणे) सुकेशनी जमधाडे (पोलीस अधिकारी, मुंबई) मा. अण्णासाहेब बोदडे (सहा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका), मा. सेवानंद तायडे(पोलीस अधिकार, दही हंडा), मा. भास्कर तायडे( पाणी पुरवठा अधिकारी, नागपूर), मा. श्रीकृष्ण झाडोकार (निरीक्षण, जि एस टी पुणे), सचिन गावंडे (प्रबुद्ध गृप, अकोला) सुमेध घनबहादुर (समन्वय अकोला) आदी मान्यवर उपस्थित होते. या लोकार्पण सोहळ्याला विनोद विरघट सरांचे मित्र, नातेवाईक, हितचिंतक तसेच गावकरी यांचीही उपस्थिती होती. मा. संदिपपाल महाराज व मा. रामपाल महाराज यांच्या विनोदी व प्रबोधनात्मक शब्दांनी लोकांचे प्रबोधन केले. या ऐतिहासिक स्मृतीदिन व जलकुंभ लोकार्पण सोहळ्याची चर्चा महाराष्ट्र भर होत आहे.

# डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा




सिन्नर/सोमनाथ गिरी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतरत्न, भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य किशोर जाधव होते. मराठी विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक सुधीर सोनवणे प्रमुख वक्ते होते.व्यासपीठावर पर्यवेक्षक रामदास वाजे, ज्येष्ठ शिक्षक दिंगबर जाधव, बाळासाहेब वारुंगसे,विजय कोकाटे, सोमनाथ गिरी ,कचेश्वर शिंदे,सोमनाथ पगार,अरुण डावरे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते .

यावेळी बोलताना प्रमुख वक्ते सुधीर सोनवणे म्हणाले की, मोबाईल संस्कृतीमुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे.

पर्यटनापेक्षा वाचन स्वस्त आहे .ज्ञान प्राप्तीचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे पुस्तकांचे वाचन होय .वाचनाला वेळेचे बंधन नसते.वाचनामुळे व्यक्तिमत्वाचा विकास होतो. कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे प्राचार्य किशोर जाधव म्हणाले की,विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन केले पाहिजे.वाचनाने बुद्धी तलखं होते. म्हणून विद्यार्थ्यांनी पुस्तकांचा आस्वाद घ्यावा. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी दररोज वाचन करण्याचा संकल्प करावा असे आव्हान जाधव यांनी केले.

पर्यवेक्षक रामदास वाजे यांनी आपल्या प्रास्ताविकात डॉ. कलाम यांच्या जीवन व कार्याची ओळख करून दिली. सूत्रसंचालन सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी केले तर आभार सुषमा थोरात यांनी मानले .यावेळी मारुती डगळे,डी. ए. रबडे, टी. के.बहिरम,राजु पगारे,राजश्री बोडके,जयश्री गोहाड ,गणेश ढोणे रामदास वारुंगसे,वृषाली घुमरे, सोमनाथ माळी,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत,रवि गोजरे,किशोर शिंदे, ज्ञानेश्वर कडभाने, संदीप सांगळे,संकेत जाधव ,ऋषिकेश कुंदे आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'वंदे भारत'च्या वेळेत बदल, अमृत भारत योजना, नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करणे, डेमु सेवासह रेल्वेस थांबा देण्याची मागणी : खा.डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामीजी

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर, पुणे विभागातील संसद सदस्य समितीच्या अध्यक्षपदी खा.डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांची निवड ; मध्य रेल्वे विभागाच्या बैठकीत विविध समस्या सोडविण्याची मागणी मध्य रेल्वे सोलापूर विभागातील रेल्वेंना थांबा देणे, मुंबई - सोलापूर वंदे भारत रेल्वेच्या वेळेत बदल करणे, अमृत भारत योजनेअंतर्गत अक्कलकोट रोड व मोहोळ रेल्वे स्थानकाचा समावेश करणे, सोलापूर - तुळजापूर - धाराशिव या नवीन रेल्वे मार्गाच्या भूसंपादन काम लवकर पूर्ण करणे, सांगोला - मंगळवेढा - सोलापूर नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करणे, दौंड ते कलबूर्गी लोकल शटल सेवा अथवा डेमू रेल्वे सुरू करणे, रेल्वेचा सोलापूर पर्यंत विस्तार करणे, पंढरपूर वाराणसी नवीन रेल्वेची सुरू करणे, यांसह विविध मागण्या खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी मांडल्या. पुणे येथे आयोजित केलेल्या सोलापूर, पुणे विभागातील संसद सदस्य समितीच्या अध्यक्षपदी खा.डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांची एकमताने निवड केली. या समितीच्या बैठकीत खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी सोलापूर विभागातील रेल्वेच्या समस्या सोडविण्याबाबत सूचना केल्या.



यावेळी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक नरेश ललवाणी, सोलापूर आणि पुणे विभागातील लोकसभा व राज्यसभा सदस्य, डी.आर.एम, अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना, वंदे भारत रेल्वे मुंबईहून सोलापूरकडे धावणार्या गाडीच्या वेळेत बदल करण्याची मागणी केली. ४ वाजता सुटणारी वंदे भारत मुंबई हून ६ वाजता सोडावी जेणेकरून मुंबईतील कामकाज संपवून पुणे, सोलापूरकडे येणे अधिक सुविधेचा होईल अशी मागणी केली . अमृत भारत योजनेत सोलापूर, दुधनी, कुर्डुवाडी रेल्वे स्थानकांचा समावेश यापूर्वी करण्यात आला आहे. परंतु अक्कलकोट रोड व मोहोळ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात यावा. या योजनेअंतर्गत दोन्ही रेल्वे स्टेशनचा समावेश करण्याची मागणी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे करण्यात आली होती. त्यामुळे दोन्ही ठिकाणांच्या समावेशासाठी विभागातून लवकरात लवकर प्रस्ताव पाठवण्याची मागणी केली आहे. दौंड-कलबुर्गी-दौंड लोकल (शटल सेवा) सुरू करण्याची आवश्यकता आहे. तसेच दौंड-कलबुर्गी- दौंड डेमो रेल नसल्याने दौंड, पंढरपूर सोलापूर, कलबुर्गीला जाणारे प्रवासी, भाविकांची गैरसोय होत आहे. त्यामुळेच ही डेमो रेल्वे दौंड - कलबुर्गी - दौंड या दरम्यानचा प्रवास करताना प्रवाशांची शेतकरी, विद्यार्थी आदींची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे ही रेल्वे सुरू करण्यासाठी लवकरात लवकर प्रस्ताव पाठवावा अशा सूचना केल्या आहेत.

त्याचप्रमाणे रे.नं. २२१५७-५८ चेन्नई मुंबई सुपरफास्ट मेल आणि रे.नं. १२११५-१६ सिध्देश्वर एक्सप्रेसला मोहोळ रेल्वे स्थानकावर थांबा मिळवा. रे. नं. २२७३१/३२ मुंबई-हैद्राबाद-मुंबई अक्कलकोट रोड रेल्वे स्थानकावर थांबा मिळवा. रे.नं. १७०२९ विजापूर हैद्राबाद ही ट्रेन विजापूरहून हैदराबादसाठी १९.२० वाजता सुटते. त्याची वेळ बदलून ती विजापूरहून एक तास आधी सोडण्याची मागणी केली. रे.नं. ११३०५ सोलापूर गदग एक्सप्रेस पुणे मार्गे ही गाडी सोलापूर स्थानकावर ७.४५ वाजता थांबते. आणि ११.५० वाजता सोलापूरहून गदगसाठी प्रयाण. सकाळी ८.३० ते ९.३० दरम्यान (२ तास आधी) निघणे अपेक्षित आहे. रे.नं. १६५३५/३६ गोलगुंबज आणि रे.नं. १७३०७/०८ बसवा एक्सप्रेसला लच्यान स्टेशनवर थांबा मिळावा. खर्डी, पंढरपूर येथील पंढरपूर - मिरज रेल्वे गेट क्र. २६ पश्चिमेकडील शिरभावी व सांगोलाकडे जाणारा मुख्य रस्ता वाहतुकीसाठी तयार करणे आवश्यक आहे.

त्याच आवारात श्री. सद्गुरू सीताराम महाराज साखर कारखान्याकडे मोठ्या प्रमाणात उसाची वाहतूक केली जाते. हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः संसदीय अधिवेशना दरम्यान १४ डिसेंबर २०२२ रोजी सांगोला-मंगळवेढा-सोलापूर नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करण्याची मागणी केली होती. याबाबत रेल्वे विभागाने पुढे काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मागवून लकरच या कामाचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या. शहरातील भैय्या चौकातील रेल्वे पुलाच्या नूतनीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करावे. रे.नं. ११०२८ दादर-पंढरपूर-दादर एक्सप्रेस ही ट्रेन आठवड्यातून ३ दिवस (सोमवार, मंगळवार, शनिवार) आपली सेवा देते. ही रेल्वे सेवा दररोज करावा अशा सूचना केल्या आहेत. यामुळे श्री. पंढरपूर ते मुंबई दरम्यान दररोज प्रवाशांना सुविधा मिळणार असून हजारो प्रवाशांना त्याचा लाभ होईल.

सोलापूर - नागपूर एक्सप्रेस ही गाडी पुन्हा सुरू करावी. हुबळी एक्सप्रेसचा विस्तार सोलापूरपर्यंत करावा यामुळे सोलापुर पर्यंत येणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळेल. नवीन पंढरपूर-वाराणसी- पंढरपूर एक्स्प्रेस गाडी आठवड्यातून दोन दिवस सुरू करण्याची मागणी केली.

दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर आणि श्री. काशी विश्वनाथ या दोन्ही तीर्थक्षेत्रांना वाराणसीशी जोडणारी ही रेल्वे सुरू व्हावी. दुधनी रेल्वे स्थानकावर ५७६५९ फलकनुमा पॅसेंजर, ५७६२८ कलबूर्गी - सोलापूर पॅसेंजर, २२१५५ कलबूर्गी - कोल्हापूर एक्स्प्रेस, १७३२० हुबळी एकस्प्रेस या चार रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा. दुधनी रेल्वे स्थानक जवळ रेल्वे पूल आहे परंतु पुलाच्या दुसऱ्या बाजूला शाळा, रुग्णालय आदींमुळे प्रवासी व स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे पुलांच्या विस्तारी करणाची मागणी केली. यावेळी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक नरेश ललवाणी यांनी सर्व प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मकता दर्शविली.

# कुटुंबावर सदगुरु हवा मल्लिनाथ महाराज यांचा मोठा आशीर्वाद : आ.सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधीः माझे राजकीय, सामाजिक आर्थिक जडन घडण मध्ये आणि विशेष करून माझे कुटुंबावर सदगुरु हवा मल्लिनाथ महाराज यांचा मोठा आशीर्वाद असल्याने मी अनेक संकटा मधून सहज बाहेर आलो आहे.असे प्रतिपादन आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.



बोलो भारत माता की जय! जय भवानी! जय शिवाजी! शनेश्र्वर मल्लिनाथ महाराज की जय! वंदे मातरम चा जय घोष करीत शनी अमवाशा निमित्त महाराष्ट्र कर्नाटक सीमेवर वसलेले अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव येथील श्रीक्षेत्र शनेश्र्वर मल्लिनाथ देवस्थान आणि आळंद तालुक्यातील चलगेरी येथील श्रीक्षेत्र देवीलिंग मल्लिनाथ देवस्थान यात्रा महोत्सव निमित्त जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदगुरु हवा मल्लिनाथ महाराज यांचा दिव्य सानिध्यात ऐतिहासिक शिव भक्ती आणि देश भक्ती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी आ.सचिन कल्याणशेट्टी बोलत होते.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, मिलन दादा कल्याणशेट्टी,सागर कल्याणशेट्टी, माजी नगरसेवक कांतू धनशेट्टी,राजू झिंगाडे, पत्रकार शिवानंद फुलारी, बसवराज बिराजदार,दयानंद बमनाले,धंनजय गाढवे आदी बहुसंख्य कार्यकर्ते भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी आ.सचिन कल्याणशेट्टी पुढे बोलताना म्हणाले की, आपल्या गावात किंवा शेजारच्या गावात सदगुरु हवा मल्लिनाथ महाराज आल अस कळाले तर आम्ही तुम्ही हातातील सर्व काम सोडून महाराजाचा दर्शनासाठी धावत येतो.महाराजाचा दर्शना मुळे एक वेगळा आनंद मिळतो.

यामुळे आम्ही तुम्ही भाग्यवान आहोत असे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर भक्ताचा राजा सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजाचा दर्शन आणि महाप्रसादचा लाभ घेवून भाविक भक्तांनी जल्लोष साजरा केला.

सूत्रसंचालन जय भारत माता सेवा समिती चे राष्ट्रीय सचिव वैजनाथ झलकी,आभार चालगिरंचे श्रीशैल पाटील यांनी मानले

यानंतर भक्ताचा राजा सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजाचा दर्शन आणि महाप्रसाद लाभ घेवून भाविक भक्तांनी जल्लोष साजरा केला.

# भिम माझा लढे देत होता,मला समतेकडे नेत होता, आंबेडकरी शाहिरी जलसाने केले लोक प्रबोधन




येवला/प्रतिनिधीः क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधकी शाहिरी जलसा परंपरेला आदर्श मानून आंबेडकरी शाहिरी शाहिरी जलसे उभे राहिले केवळ मात्र मनोरंजन न करता माणसांचे मन,मनगट,मेंदू घडवणं,स्वतःच्या धडावर स्वतःचा मेंदू ठेवण्याबरोबर ज्वलंत सामाजिक,राजकीय,धार्मिक,अर्थी,सांस्कृतिक प्रश्नांबद्दल लोक जागृती निर्माण करण्याचे काम लोककवी वामनदादा कर्डक यांच्या साहित्य शाहिरीचे गाणे गात धर्मांतर घोषणेच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त समकालीन तेचा लोकशाहीर शरद शेजवळ, शाहीर आकाश पवार प्रस्तुत आंबेडकरी शाहिरी जलसा कार्यक्रमातून करण्यात आले.

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थिती शाहीर शरद शेजवळ यांनी तुझ्या हाती तूप आलं तुझ्या हाती साय,समाजाचं काय रं गड्या समाजाचं काय ? हे गीत सादर करून लोकप्रतिनिधीना वामनदादा कर्डक यांच्या गीतातून सवाल उपस्थित करून लोकप्रतिनिधींनी समाजातील शेतकरी,कामगार,कष्टकरी,बेरोजगार,महिला व मागासवर्गीय जनतेच्या ज्वलंत प्रश्नाकडे गीतांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केले. शा.आकाश पवार यांनी लोककवी वामनदादा कर्डक यांच्या वंदन माणसाला, दे कायेचे अन मायचे चंदन माणसाला ! कुणी बनविले धनी कुणाला कुणी बनविले दास कष्टकऱ्यांच्या गळी बांधला कुणी गुलामी फास ? असा सवाल करून दगड धोंड्याला वंदन न करता करू वंदन माणसाला हो,वंदन माणसाला ह्या गीताने आंबेडकरी शाहिरी जलसाची सुरुवात करण्यात आली.

साऊ पेटती मशाल,साऊ आग ती जलाल,साऊ शोषितांची ढाल,साऊ क्रांतीच पाऊल ह्या गीतानी सावित्रीमाई फुले यांच्या कार्य कर्तृत्वाचा आलेख मांडत तोच आदर्श आधुनिक महिला युवतींनी घ्या असा संदेश देणारे गीत गायिका ऐश्वर्या पवार यांनी सादर केले.

गायिका शीतल भंडारे यांनी स्त्री सुधारक माता यांच्या आदर्शाचे गीत शिवबाला जसे घडविले तिने तशी जिजाऊ बनवी,ज्ञानाचा दिवा घरोघरी लावणारी सावित्री बनवावी,दुखावलेल्या कोटी दिनाची आई रमाई बनवावी मला जिजाऊ सावित्री रमाई माता तुमच्या मध्ये दिसावी हे गीत सादर करण्यात केले

गायक धनंजय काकडे गोदातीरी पडला तरी लढला सैनिक माझा उघडलाच नाही काळ्या रामाचा दरवाजा,माणसास पाणी पाजा माणसास पाणी,निनादात होती सारी भिमाचीच वाणी,इतिहास होता चवदार तळ्याचा ताजा हे वामनदादा कर्डक यांचं गीत काळजाचा ठाव घेऊन गेले.

भारताला लोकशाही खेरीज कोणतीच शाही वाचवू शकणार नाही त्याकरता भारतीय संविधान संविधानिक मूल्य विचार वाचले पाहिजे.ज्या प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की संविधान कितीही चांगलं असलं पण ते संविधान योग्य राजकर्त्यांच्या हाती नसेल तर ते अयशस्वी होईल.आजच्या घडीला राजकीय नेते पक्ष क्षणोक्षणी घटनेची पायमल्ली करत असून त्यावर हि संविधान वाचवा चलार गाडयांनो

संविधान वाचवा चला रं हे गीत श्रोत्यांना विचार करायला लावून गेले.
एकिच नरड चिराया बघतोय
मनुवादी ह्यो इळा र
संविधान वाचवा चलार गाडयांनो
संविधान वाचवा चला र.ह्या गीताने सर्वांचा लक्ष वेधून घेतलं.

लोकशाही वाचविण्यासाठी संविधान वाचलं पाहिजे असा संदेश देणार गीत यांनी सादर केले.

दाही दिशा नाटल्या कशा
एकीची घडऊ भाषा
एक करू कोटी जणांना
चला यारे या सारे या
सामजु संविधाना.

उजाड राणी किमया केलीस मोठी भीमा तुझं प्रणाम कोटी कोटी,भिम माझा लढे देत होता मला समतेकडे नेत होता.ह्या शाहीर शेजवळ यांनी सादर केलेल्या गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले.

देशातील ज्वलंत सामाजिक प्रश्न,मतपत्रिकेचा आग्रह व जल,जंगल,जमीन ह्या बद्दलचे प्रहन

बाई इकता इकता यांनी ईकला गं देश अन पालटलं भेश गं माझे माई...धक्का चावडीला देतो गं माझे माय ह्या गीतातून मांडण्यात आले.

एक निळा आणि एक भगवा..
माझा आजा म्हणे बाप..
देव्हार बाजूला सरल
पिंपळच्या पानावर.
भिम राव माझा.....
उद्धारली कोटी कुळे
पैदा होतो भीमसा नर....
आले महात्मा फुले....
बुद्ध कबीर भीमराव फुले...

ह्या व अशा अनेक गीतातून बुद्ध कबीर तुकोबा छत्रपती शिवराय फुले-शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

आंबेडकरी शाहीरी जलसा कलावंत गायक ऐश्वर्या जाधव-पवार,शाहीर आकाश पवार,शीतल भंडारे,भिमराव खेत्रे,धनंजय काकडे यांनी ज्वलंत सामाजिक ,धार्मिक,आर्थिक,राजकिय विषयावर विविध प्रबोधनात्मक गीतांचे सादरीकरण केले. अर्जुन येरबागे (ढोलकी), संतोष चंदनशिवे (हार्मोनियम),ताल वाद्य सिद्धार्थ गुंजाळ,आरोह पवार,मनोज गुंजाळ यांनी साथ संगत केली. येवला पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश वाघ,येवला मर्चंड कॉ.बँक चे संचालक सुभाष गांगुर्डे,गुड्डू जावळे,सुरेश सोनवणे,विकास घोडेराव ह्या वेळी उपस्थित होते. मुक्ती महोत्सवाची आंबेडकरी शाहिरी जलसा,रक्तदान,ग्रंथदान उपक्रमाने सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय, राष्ट्रीय महाकवी वामनदादा कर्डक मुक्तीभूमी अभ्यासिका येवला यांच्या सदस्य पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# रक्षाविसर्जन ऐवजी वृक्षारोपण : निकाळजे कुटुंबियांचा स्तुत्य उपक्रम

वागदरी/ एस.के.गायकवाड : आंबेडकरी चळवळीतील स्मृतिशेष शिवाजी पंडा निकाळजे रा. दिंडेगांव ता.तुळजापूर यांच्या निधनानंतर त्यांच्या पुत्रांनी परंपरेने चालत आलेली अंत्यविधीच्या तिसऱ्या दिवशी नदीत केले जाणार्या रक्षाविसर्जनाला फाटा देत आपल्या वडिलांनाच्या अस्थी रक्षाविसर्जन आपल्या शेतात एक फळांचे झाड लावून व्रक्षारोपनाने करून समाजापुढे एक आदर्श घातला आहे.

आपण नेहमी जलप्रदूषणावर बोलतो, लिहतो, ऐकतो जलप्रदूषणामुळे होणारे तोटेही माहिती असतात *परंतू परंपरेने चालत आलेल्या रुढी च्या विरुद्ध कृतीला सहसा कुटुंबियांचे मन धजावत नसते. परंतू दिंडेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच गोपीचंद निकाळजे व खंडू निकाळजे यांनी आपल्या वडिलांच्या निधनानंतर स्वतःच्या शेतजमिनीत फळाचे झाड लावून वृक्षारोपनाच्या



खड्ड्यात रक्षाविसर्जन करून समाजात एक आदर्श निर्माण केला आहे. अशा कृतीमामागची भूमिका स्पष्ट करतांना दिंडेगांवचे उपसरपंच गोपी निकाळजे व त्यांचे बंधू खंडू निकाळजे यांनी सांगितले की, आमचे वडिल वृक्षाच्या रुपाने चिरंतन जीवंत असल्याची जाणीव क्षणोक्षणी आम्हा कुटुंबियांना होईल.तसेच हा वृक्ष वडिलांच्या स्मृतित लावला गेला असल्याने घरातील प्रत्येकजण त्याची विशेष काळजी घेवून जोपासेल तसेच दिवसेंदिवस वृक्षाप्रतीचा आदर कमी होत असल्याने बेसुमार वृक्षतोड होते परंतू अशाप्रकारे घरच्या व्यक्तीच्या आठवणीत वृक्षारोपण केल्यामुळे कुटुंबियांना त्या वृक्षाप्रती एक वेगळाच आदरभाव निर्माण होईल यामुळे त्या झाडाची फांदी तोडण्याअगोदर घरातील प्रत्येकजण हजारदा विचार करेल अशामुळे खूप काही सकारात्मक विचार वृक्षासंदर्भात निर्माण होतील घरातील लहान मुलांमध्ये सुद्धा वृक्षसंवर्धनाबद्दल सकारात्मक बदल घडून येईल.असे अतिशय पर्यावरणवादी विचार गोपीचंद निकाळजे व खंडू निकाळजे यांनी मांडले.. खरोखरच प्रत्येकांनी असा पथदर्शी हा स्तुत्य उपक्रम सुरू करायला हवा. आपल्या कुटुंबियातील व्यक्तीच्या निधनानंतर ही ती व्यक्ती वृक्षरुपाने जीवंत राहिल..

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

नवी दिल्ली : माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती महाराष्ट्र सदनात आज साजरी करण्यात आली. कोपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदनात आयोजित कार्यक्रमात सहायक निवासी आयुक्त डॉ.राजेश अडपावार यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित महाराष्ट्र सदनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्पअर्पण करून आदरांजली वाहिली.



# वागदरी येथील परमेश्वर यात्रेत अपघातग्रस्त कुटूंबियांना आ.सचिन कल्याणशेट्टी हस्ते मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी एक लाख रुपये सुपुर्द

अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी येथिल ग्रामदैवत श्री परमेश्वर यात्रा महोत्सवानिमित्त निघालेल्या रथोत्सवात रथाचा लोखंडी रॉड तुटून चाक निखळून झालेल्या अपघातात कै. गंगाराम तिप्पण्णा मंजुळकर व कै.इरप्पा गिरमल नंदे या दोन ग्रामस्थांचा मृत्यू झाला होता.या अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबास आधार मिळावा म्हणून आमदार श्री सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य मिळावे ही मागणी मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे केली होती. त्यास अनुसरून मुख्यमंत्री महोदयांनी मृत पावलेल्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी एक लाख रुपये याप्रमाणे एकूण दोन लाख रुपये इतके अर्थसहाय्य विशेष बाब म्हणून मंजूर केले होते.आज त्या मदतनिधींचा चेक आमदार श्री सचिनदादा कल्यांणशेट्टी ह्याच्या हस्ते अपघातग्रस्त कुटूंबियांना सुपुर्द करण्यात आले.




यावेळी तहसीलदार श्री बाळासाहेब शिरसाट ,श्री श्रीशैल ठोंबरे, श्री प्रदीप जगताप ,श्री शाणप्पा मंगाणे ,श्री धोंडप्पा यमाजी, श्री बसवराज शेळके, सरपंच श्री श्रीकांत भैरामडगी, उपसरपंच लक्ष्मीबाई पोंमाजी,श्री कमलाकर सोनकांबळे उपसरपंच, श्री प्रकाश पोमाजी ,श्री संतोष पोमाजी,श्री सुनील सावंत,श्री बसवराज पाटील,श्री राजू मंगाणे,श्री शिवा घोळसगाव,श्री हनिफ मुल्ला ,श्री राजकुमार हुग्गे,श्री घाळय्या मठपती,श्री महादेव सोनकवडे ,श्री लक्ष्मण सोनकवडे, श्री उमेश पोमाजी ,श्री शांतप्पा कोठे,श्री कल्लाप्पा बिराजदार,श्री वीरभद्र पुरंत, व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वैनतेय इंग्लिश मि. स्कूल निफाड च्या चिमुकल्यांनी दिले मातीला विविध आकार



निफाड/ प्रतिनिधीः निफाड येथील न्या.रानडे विद्याप्रसारक मंडळ संचलित इंग्लिश मीडियम प्रायमरीच्या बालगोपाळांनी माझी माती माझा देश या उपक्रमात सहभाग घेऊन चिकन मातीच्या चिखलाशी खेळत मातीला दिले विविध आकार

माझी माती माझा देश हा उपक्रम नुकताच वैनतेय इंग्लिश मीडियम च्या प्रांगणात प्र. मुख्याध्यापिका सौ पल्लवी सानप यांचे मार्गदर्शनाखाली पार पडला मातीशी आपले जन्मापासून जोडलेले नाते या उपक्रमाद्वारे मुलांच्या ठिकाणी दृढ होते .याप्रसंगी मुलांनी चिकन माती पासून विविध फळे, अंकगणिताचे गोळे, तसेच काड्या पेटींच्या काड्याचा वापर करून अंक तयार करून चिकटवून अंकांची ओळख करून घेतली, तर चिंचोक्यांचा वापर करून ए टू झेड अक्षरे तयार केली ,यावेळी सोनाली तौवर यांनी स्मरण ,स्पर्श, ज्ञान, अंकगणित, प्राचीन, संस्कृतीचे ज्ञान, इंद्रियांची ओळख तसेच विविध रंग ,रूप, आकार, याविषयी लहान मुलांना मार्गदर्शन केले. या चिमुकल्याच्या हातांनी विविध वस्तू बघून विद्यालयाच्या सर्व विश्वस्तांनी बालगोपाळांचे व शिक्षक वृंदांचे कौतुक केले यावेळी इंग्लिश मीडियम च्या मुख्याध्यापिका सौ पल्लवी सानप, वर्गशिक्षिका सोनल तौवर, प्रियंका वडघुले, नेहा पोटे , यांचे मार्गदर्शन लाभले



# ग्रंथ वाचनाने मनाची प्रगल्भता वाढते : प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार

सोलापूर/प्रतिनिधीः ग्रंथ हे ख-या अर्थाने गुरु रुपाने मार्गदर्शन करीत असतात.त्यान्च्या आधाराने मानव प्रगतीचे अनेक टप्पे पार करीत असतो.ग्रंथाच्या माध्यमातून नवे सिध्दान्त उदयाला येतात.मन,मनगट आणि मस्तक मजबूत करण्याचे कार्य ग्रंथ करतात. यासाठीच वाचन ,मनन ,चिंतन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार यान्नी माजी राष्ट्रपती डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यान्च्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कलाम यान्च्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांकडून करण्यात आले.

श्री सिद्धेश्वर सार्वजनिक वाचनालय कर्णिक नगर,श्री महालक्ष्मी सार्वजनिक वाचनालय निलम नगर यान्च्या विद्यमाने आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल गुरुनाथ हत्तीकाले यानी केले.व कलाम यान्च्या जीवनातील धीरोदात्त संघर्षमय घटनांबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमास किरण भंडारे,श्रीशैल शिल्ले,अजय श्रीराम,नरसिंग मिसालोलू,अत्तार भाई व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार प्रदर्शन ग्रंथपाल अश्विन कुमार जम्मा केले.

# स्किल बेस शिक्षणाला जागतिकीकरणात मोठी संधीः डॉ. ए.एम देशमुख

धाराशिव/प्रतिनिधीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर धाराशिव येथील व्यवस्थापन शास्त्र विभागामार्फत एम.बी.ए आणि एस.सी.ए विषयाला या वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी कार्पोरेटच्या धर्तीवर इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्पोरेट मध्ये एखादा कर्मचारी जेव्हा आपल्या नोकरीसाठी रुजू होतो तेव्हा त्यासंबंधी कंपनीचे ध्येय,धोरण, उद्दिष्ट, कार्यप्रणाली वातावरण आणि भविष्याचे नियोजन याच्या बाबतीत सुरुवातीचे काही काळ मार्गदर्शन दिले जाते. त्याच पद्धतीने व्यवस्थापन शास्त्र विषय हा व्यावसायिक अभ्यासक्रमाशी नीगडीत असल्यामुळे विभागामार्फत इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन या वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. ए.एम देशमुख कार्यक्रम अध्यक्ष म्हणून विद्यापीठ



उपपरिसराचे संचालक डॉ. प्रशांत दीक्षित, व्यवस्थापनशास्त्र विभागाचे संचालक डॉ. सुयोग अमृतराव, आणि कार्यक्रम समन्वयक प्रा. वरून कळसे, उपस्थित होते. उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर विविध सत्रा मध्ये करण्यात आले. प्रा. सचिन बसय्यें, आणि डॉ.विक्रम शिंदे यांनी विविध विषयावरती मार्गदर्शन केले. उद्घाटन कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुण्यांनी भारतात आणि जगात उपलब्ध असणाऱ्या नवनवीन संधी आणि त्यासाठी लागणाऱ्या स्किल या कशा आत्मसात केल्या जाऊ शकतात यावरती मार्गदर्शन केले. उप परिसर संचालक डॉ. दीक्षित यांनी व्यवस्थापन शास्त्र विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमाचे आणि प्रगतीचे कौतुक केले. व्यवस्थापन शास्त्र विभागाचे संचालक डॉ. सुयोग अमृतराव यांनी विभागाचा मागील १४ वर्षापासून चा लेखाजोखा मांडला, आणि पुढील काळामध्ये काय काय उपक्रम नियोजित आहेत व ते कसे साध्य केले जातील याची माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती शिरसागर यांनी केले. तसेच आभार कार्यक्रम समन्वयक प्रा. वरून कळसे यांनी मानले, कार्यक्रमास प्रा. शितलनात एखंडे, प्रा. शरद सावंत, विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# माणकेश्वर वाचनालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. थोर शास्त्रज्ञ आणि भारताचे राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले. वाचनालयाचे संचालक सुहास सुरळीकर यांनी आपल्या प्रास्ताविकात वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.

यानिमित्त मराठीतील निवडक साहित्याचे प्रदर्शनही वाचनालयात आयोजित केले होते.याप्रसंगी वाचनालयाचे चिटणीस बाळासाहेब कापसे, हिशोब तपासनीस दत्तात्रेय उगावकर, संचालक नईम खान पठाण, वाचक जगू शेठ कुंदे,कर्मचारी नितीन बनसोडे, आदी उपस्थित होते